# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## उप प्रादेशिक कार्यालय, मुंबई-१

दुरध्वनी क्र . : २५५०५९२२६
फॅक्स क्र . : २५५०५९२२८

रायकर चेंबर्स, अ वींग,
२१६, दूसरा मजला, देवनार गांव रोड,
जैन मंदिरा जवळ, गोवंडी (पूर्व)
मुंबई - ४०००८८

जा. क्र . मप्रनि/उप-प्राकामुं-१/१५०८२६छापुफटी००३७ दिनांक :- २६ /०८/ २०१५

प्रति,

सहसंचालक (जल प्रदुषण नियंत्रण),

म. प्र. नि. मंडळ, सायन,

मुंबई-४०००२२

विषय :- मे. ॲड्रॉईट इस्टेटस विकासक पी. लिमिटेड, सी.एस.नं.५७७, नेपियन सी रोड मलबार हिल, डी वॉर्ड, मुंबई येथे प्रस्तावित इमारत पुर्नबांधणी प्रकल्पाची पर्यावरण विषयक जनसुनावणीचे इतिवृत्त..

संदर्भ :- कार्यालयीन आदेश क्र. इ. २०१ दि. १३.०७.२०१५.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन मे. ॲड्रॉईट इस्टेटस विकासक पी. लिमिटेड, सी.एस.नं.५७७, नेपियन सी रोड मलबार हिल, डी वॉर्ड, मुंबई इमारत पुर्नबांधणी प्रकल्प प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक अनुज्ञतीसाठी जाहिर सुनावणी दि. ०७.०८.२०१५ रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई (शहर), ओल्ड कस्टम हाऊस, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे आयोजित करण्यात आली होती.

सदर सुनावणी दरम्यान इमारतीच्या रहिवाशी तसेच भाडेकरु यांनी केलेल्या सुचना, टिकाटिप्पणी, विचार व आक्षेप इत्यादी समाविष्ट करुन जन सुनावणीचं इतिवृत्तांत आपल्या माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडण्यात येत आहे. इतिवृत्ता सोबत खाली नमुद केलेली दस्ताऐवज जोडण्यात येत आहे.

१. जन सुनावणीचे मा. अध्यक्ष, सदस्य व आयोजक यांचे स्वाक्षरीतील इतीवृत्त

२. जन सुनावणी बाबत आदेशाची प्रत

३. दैनिक फ्री प्रेस जरनल या इंग्रजी दैनिकात व नवशक्ती या मराठी दैनिकात प्रसिध्द झालेल्या सुनावणीबाबतच्या नोटीसच्या छायांकित प्रत.

४. भाडेकरुंना दिलेल्या नोटसची प्रत

५. जन सुनावणीच्या चलचित्र फित

६. सुनावणीस उपस्थित लोकांचा हजेरी पट.

७. कार्यकारी सारांशाची इंग्रजी व मराठी प्रत.

आपला विश्वासु

(अमर. बा. दुर्गुळे)
आयोजक/सदस्य/उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई-१

प्रत सादरः-

१. जिल्हाधिकारी, मुंबई शहर तथा अध्यक्ष जन सुनावणी समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई,
२. प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ ,मुंबई.
३. मे. ॲड्रॉईट इस्टेटस विकासक पी. लिमिटेड, सी.एस.नं.५७७, नेपियन सी रोड मलबार हिल, डी वॉर्ड, मुंबई

इतिवृत्त

मे. ॲड्रॉईट इस्टेटस विकासक पी. लिमिटेड, सी.एस.नं.५७७, नेपियन सी रोड, मलबार हिल, डी वॉर्ड, मुंबई *येथे प्रस्तावित पुनर्बांधकाम पर्यावरणविषयक जनसुनावणी दिनांक 07.08.2015 रोजी सकाळी 11.30 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर, ओल्ड कस्टम हाऊस, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-400 001 याठिकाणी आयोजित करण्यात आली. सदर जनसुनावणीसाठी खालील शासकीय अधिकारी उपस्थित होते.*

१) श्री. चंद्रकांत थोरात - अध्यक्ष
निवासी उप जिल्हाधिकारी तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, मुंबई शहर

२) श्री. अमर दुर्गुळे, - सदस्य/आयोजक
उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई-१
म.प्र.नि. मंडळ, मुंबई.

*जनसुनावणीचाइतिवृत्तपुढीलप्रमाणे-*

*सर्वप्रथम श्री. अमर दुर्गुळे, जनसुनावणीचे आयोजक यांनी सर्वांचे स्वागत करुन मा.अध्यक्षांच्या परवानगीने जनसुनावणीस सुरुवात केली. त्यांनी आजची जनसुनावणी ही भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, दिल्ली यांच्या अधिनियम 2006 व सुधारीत 2009 तसेच जनसुनावणी सागरी तटीय विनियमन अधिनियम 2011 चे कलम क्र.8 व्हीडीसी 4 शुध्दीपत्रक 6 जानेवारी 2011 मधील तरतुदीनुसार घेण्यात येत आहे असे सांगितले. सदर प्रकल्पधारकाने म.प्र.नि.मंडळाकडे पर्यावरणविषयक जाहीर सुनावणीसाठी प्रस्ताव दिनांक 09.06.2015 रोजी सादर केला. तद्नंतर निवासी उपजिल्हाधिकारी, तथा अपर जिल्हादंडाधिकारी, मुंबई शहर यांनी शुक्रवार दिनांक 07.08.2015 रोजी पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्याची तारीख निश्चित केली. सदर जाहीर जनसुनावणीची जाहिरात एक महिना अगोदर "दैनिक नवशक्ती" या वर्तमान पत्रात मराठी भाषेमध्ये, तसेच दैनिक "फ्रि प्रेस जर्नल" या वर्तमान पत्रात इंग्रजी भाषेमध्ये दिनांक 05.07.2015 रोजी प्रसिध्दी करण्यात आली. त्याअनुषंगाने आजची पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजीत करण्यात आलेली आहे. सदर प्रस्तावीत प्रकल्पाच्या प्रवर्तकांनी तयार केलेल्या पर्यावरणविषयक अहवालाच्या प्रती जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-400 001, मा. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग मंत्रालय, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई. प्रादेशिक अधिकारी (मुख्यालय), मप्रनिमंडळ, सायन, मुंबई, सहाय्यक आयुक्त, "डी" विभाग, बृन्हमुंबई महानगरपालिका ऑफिस इमारत, 110,*

पहिला मजला, जोबनपुत्रा कंपाऊंड, नाना चौक, मुंबई-400 007, प्रादेशिक अधिकारी/ उपप्रादेशिक अधिकारी, मप्रनिमंडळ, मुंबई. इ. ठिकाणी भाडेकरू/ रहिवासी यांना अभ्यासासाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. या जनसुनावणीचा उद्देश भाडेकरू/रहिवासी यांना प्रस्तावित प्रकल्पा विषयी माहिती देणे, प्रकल्पामुळे पर्यावरणावर काय परिणाम होईल व त्यावर करावयाच्या उपाययोजना यांची माहिती देणे हा आहे असे सांगितले. श्री. दुर्गुळे यांनी सांगितले की, प्रथम प्रस्तावित प्रकल्पाचे सल्लागार प्रकल्पाविषयीची माहिती सादर करतील व त्यानंतर भाडेकरू/ रहिवासी यांनी त्यांचे सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबत आक्षेप, तक्रारी, सुचना मांडाव्यात व त्याची नोंद इतिवृत्तात घेउन ते पुढे महाराष्ट्र सागरतटीय व्यवस्थापन प्राधिकरण, मंत्रालय, मुंबई यांना पाठविले जाईल. तसेच या समितीचे काम जनसुनावणी घेणे, भाडेकरू/रहिवासी टिका, टिपणी यांची नोंद घेवून त्याचा अहवाल शासनाला सादर करणे हे आहे असे सांगितले व प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी माहिती देण्याची सूचना केली.

यानंतर श्री. सौरभ जैस्वाल, प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी सदर प्रकल्पाबाबत विस्तृतपणे स्लाईड शोद्वारे सादरीकरण केले. सदर सादरीकरणामध्ये त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहिती, ठिकाण इ. बाबतची माहिती दाखविली. त्यांनी सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबतचा बिल्डींग प्लान, वाहन स्थळ आणि रहिवाशी क्षेत्र इत्यादींची माहिती सादर केली. सदर प्रकल्प हा सागरतटीय निर्बंधन क्षेत्र 2 मध्ये येतो. सदर प्रकल्पाच्या ठिकाणी एक इमारत उभारण्यात येत असून त्यामध्ये तळघर + तळमजला + 1 ते 10 पार्किंगसाठी जागा+11 ते 28 मजले अशी प्रस्तावित इमारत बांधण्यात येणार आहे. सदर प्रस्तावित प्रकल्पाच्या जागेचे क्षेत्रफळ हे 1841.98 चौ. मी. इतके असून यावरती बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ हे 11416.83 चौ. मी. इतके असेल. सदर प्रस्तावित प्रकल्पाची किंमत अंदाजे रु.13 कोटी इतकी असेल. उभारण्यात येणाऱ्या इमारतीची उंची ही 123.75 मी. इतकी असेल. सदर इमारतीमध्ये एकूण ४६ सदनिका असून यामध्ये एकूण 248 रहिवासी असतील. बांधकामाच्यावेळी एकूण 30 घ.मी. इतक्या पाण्याचा वापर करण्यात येईल व त्यामधून कोणत्याही प्रकारच्या सांडपाण्याची निर्मिती होणार नाही. प्रकल्प पुर्ण होऊन रहिवासी राहण्यास आल्यानंतर पाण्याचा वापर हा 32 घ.मी. प्रती दिन इतका असेल. त्यातून निर्माण होणारे सांडपाणी हे 28 घ.मी.प्रती दिन इतके असेल त्यापैकी 16 घ.मि.प्र.दिन इतक्या मलयुक्त सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी 20 घ.मी. प्रति दिन इतक्या क्षमतेचा घरगुती सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा बसविण्यात येणार असून यामध्ये प्राथमिक, तृतीय स्वरुपाची सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा बसविण्यात येणार आहे. प्रक्रियाकृत सांडपाणी हे इमारतीच्या आवारातील बाग-बगीचा, झाडे तसेच शौचालयासाठी पुनर्वापर करण्यात येईल व

*उर्वरित अतिरिक्त सांडपाणी हे पुढे महानगरपालिकेच्या गटारामध्ये सोडण्यात येईल. सदर प्रकल्पामध्ये विजेचा पुरवठा खंडीत झाल्यानंतर अत्यावश्यक बाब म्हणून एकूण 100 किलोवॅट इतक्या क्षमतेचे डिझेल जनरेटर बसविण्यात येईल. सदर विद्युत जनरेटर हे पुर्णपणे बंदीस्त तसेच योग्य त्या उंचीची चिमणी असणारे असेल. सदर प्रकल्पामधून निर्माण होणाऱ्या 87.30 कि.ग्रॅ. प्रतिदिन इतक्या घनकचऱ्याचे वर्गीकरण सुका व ओला असे करण्यात येईल. ओला कचरा 62.1 कि.ग्रॅ. प्रति दिन हा पुढे मुंबई महानगरपालिकेकडे पुढील प्रक्रियेसाठी पाठविण्यात येईल. तर सुका कचरा 25.2 कि. ग्रॅ. प्रतिदिन हा पुनर्वापरासाठी पाठविण्यात येईल व विकला जाईल. सदर प्रकल्पामध्ये भुगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्याच्या दृष्टीने पाणी पुन:र्भरण कार्यक्रम राबविण्यात येईल. सदर प्रकल्प उभारत असताना आवाजाची तिव्रता कमी करण्याच्या दृष्टीने योग्य ती उपाय योजना करण्यात येईल. सादरीकरणाच्या शेवटी तांत्रिक सल्लागाराने प्रकल्प धारकाकडून राबविण्यात येणार असलेल्या पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती देवून सादरीकरण समाप्तकेले.*

*तद्नंतर निवासी उपजिल्हाधिकारी तथा अपर जिल्हादंडाधिकारी, मुंबई शहर तथा अध्यक्ष यांनी उपस्थित रहिवासी व भाडेकरु यांना प्रकल्प प्रवर्तकाने पर्यावरण विषयक केलेल्या सादरीकरणाच्या अनुषंगाने काही शंका, टिकाटिपणी अथवा उपाय योजनाबद्दलची माहिती द्यावयाची असल्यास आपण ती याठिकाणी तोंडी अथवा लिखीत स्वरूपात सादर करू शकतात. सदरची माहिती ही फक्त पर्यावरण विषया संबंधीत असणे आवश्यक आहे. सदर प्रश्नांच्या अनुषंगाने प्रकल्प प्रवर्तक त्यावर करण्यात येणाऱ्या उपाय योजनांच्या अनुषंगाने थोडक्यात माहिती देतील असे नमूद केले.*

*प्रश्नोत्तरे*

**श्री. अमर दुर्गुळे, उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई-१ म.प्र.नि. मंडळ, मुंबई तथा आयोजक, जनसुनावणी समिति**

प्रश्न :- प्रकल्पाच्या जागेवरती किती झाडे लावणार आहात ? प्रकल्पाची सांडपाणी संयंत्रणा कोठे उभारली जाणार ?

उत्तर :- *श्री.* सौरभ जैस्वाल, *प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी* प्रकल्पाच्या ठिकाणी उंच वाढणारी अशोका तसेच पाम सारखी झाडे लावण्यात येतील तर सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा ही तळघरामध्ये बसविण्यात येईल असे सांगितले.

*श्री.चंद्रकांतथोरात, निवासी उपजिल्हाधिकारी व अपर जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष* **लोकसुनावणी समिती.**

प्रश्न :- प्रकल्पाच्या ठिकाणी सद्य:स्थिती काय आहे ? तसेच घनकचरा व्यवस्थापनासाठली काय तरतूद केलेली आहे ?

उत्तर :- *श्री. सौरभ जैस्वाल, प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी सद्य:स्थितीमध्ये या जागेवरती* अस्तित्वात असलेली जुनी इमारत पाडण्यात आली असून त्याठिकाणी *तळ* घर अधिक तळ *मजला व वरील 9* मजले इतके बांधकाम झालेले आहे व सद्य:स्थितीत पर्यावरण विभागाच्या आदेशानुसार बांधकाम बंद आहे. तसेच बांधकामाच्या वेळी निर्माण झालेल्या घनकचऱ्याची विल्हेवाट ही महानगरपालिकेने नेमून दिलेल्या जागेवरती केली जाते असे सांगितले.

*शेवटी जनसुनावणी समितीचे अध्यक्ष निवासी उपजिल्हाधिकारी, तथा अपर जिल्हादंडाधिकारी, मुंबई शहर यांनी उपस्थितांनी जे म्हणणे आज मांडलेले आहे त्याची नोंद घेण्यात आलेली आहे. आजच्या जनसुनावणीचे इतिवृत्त, सी. डी. व आपली निवेदने ही पुढे महाराष्ट्र सागरी तटीय व्यवस्थापन प्राधिकरण, मंत्रालय, मुंबई यांना पाठविले जाईल असे सांगितले. तसेच सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीस आपण सर्वांनी उपस्थित राहून आपली मते मांडून जनसुनावणी शांततेने पार पाडल्याबद्दल उपस्थितांचे आभार मानले व त्यांनी जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.*

| | |
|---|---|
| (अमर बा. दुर्गुळे)<br>उपप्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, मुंबई,<br>आयोजक/सदस्य<br>लोकसुनावणी समिती | ( चंद्रकांत थोरात )<br>निवासी उपजिल्हाधिकारी तथा<br>अपर जिल्हादंडाधिकारी, मुंबई शहर<br>व अध्यक्ष,<br>लोकसुनावणी समिती. |

MINUTES OF PUBLIC HEARING OF

PROPOSED REDEVELOPMENT OF THE BUILDING BY

M/s. Adroit Estate Developers Pvt.Ltd.,

On Proposed redevelopment on plot bearing C.S.No.577, Situated at

Malbar Hill Division "D" Ward,Nepean Sea Road,Mumbai-400007

Date of Public Hearing: 07/08/2015 Time : 11:30 hrs.

Venue : Office of the Collector & District Magistrate Mumbai City, Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Fort, Mumbai 400 001.

---

Public hearing for proposed redevelopment of building by M/s. Adroit Estate Developers Pvt. Ltd., on Proposed redevelopment on plot bearing C.S.No.577 Situated at Malbar Hill Division, "D" ward, Nepean Sea Road,Mumbai-400007. The following panel members of the public hearing committee were present.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Shri. Chandrakant Thorat<br>Resident Deputy Collector &<br>Addl. Dist. Magistrate,<br>Mumbai City. | - | Chairman |
| 2. | Shri. Amar Durgule<br>Sub-Regional Officer,<br>Maharashtra Pollution Control Board,<br>Mumbai - I. | - | Member/Convener |

In the beginning Shri. Amar Durgule, Sub Regional Officer, MPC Board, Mumbai-I, convener of the public hearing meeting welcomed the Chairman of the Committee, the panel members, the tenants /residents and commenced the meeting with the permission of Chairman. He explained the purpose of public hearing, mentioning that as per the MOEF, Govt. of India, New Delhi, Notification S.O/1533 dated 14th Sept.2006 and amended thereto, and Coastal Regulation Zone (CRZ) Notification dated 6th January, 2011, the Public hearing of tenants / residents shall be carried out for redevelopment and construction activity in the CRZ area. Accordingly, M/s. Adroit Estate Developers Pvt.Ltd., had submitted application for public hearing along with detailed Environmental Synopsis report for the proposed redevelopment of building on Proposed redevelopment on plot bearing C.S.No.577, Situated at Malbar Hill Division, "D" Ward, Nepean Sea Road, Mumbai-400 007 to Maharashtra Pollution Control Board dated 24.06.2014 Accordingly, the Resident Deputy Collector & Addl. Dist. Magistrate, Mumbai City had fixed the date of public

hearing on 07.08.2015. The Convener briefed that, a public notice regarding the said public hearing was published in the daily newspaper "Navshakti" in Marathi and "The Free Press Journal" in English on 05/07/2015, i.e. one month prior to the meeting, inviting suggestions, objection and comments about the proposed redevelopment project. Documents of Environmental Synopsis's regarding public hearing were made available for review/study for the tenants or residents of Mumbai at –

1. Office of the Collector & District Magistrate Mumbai City, Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Fort, Mumbai – 400 001,
2. Regional Officer (P&P), MPCB, Sion, Mumbai, Regional Office & Sub Regional Office, Mumbai - I, Raikar Chamber, "A" wing, 216, 2nd Floor, Deonar Gaon Road, Near Jain Mandir Govandi (E), Mumbai-400088.
3. Environment Dept., New Administrative Building, 15th floor, Mantralaya, Mumbai.
4. Astt. Commissioner, 'D' Ward Office Bldg. R.No.110, Jobanputra Compound, Nana Chowk, Mumbai – 400 007.

The convener also informed to the tenants / residents that the purpose of the public hearing Committee was to conduct the public hearing and to record the opinion, suggestions/objections of the tenants / residents, with regards to environment point of view. The Committee will not take any decision about the project. He also informed that the said public hearing is for the tenants / residents affected by the project. The project proponent will present the details about the project and its impact on environment and the mitigation measures proposed by the project proponent. Thereafter the tenants / residents can give their, suggestions/ objections, comments, and opinions verbally as well as in writing about the project, which will be recorded and the same will be forwarded to the Maharashtra Coastal Zone Management Authority, Mantralaya, Mumbai.

After this, with the permission of Resident Deputy Collector & Addl. Dist. Magistrate, Mumbai City and Chairman, the Public Hearing Procedure was started.

Shri. Sourabh Jayswal, the technical consultant of the said project, briefed about the proposed project by power point presentation. He showed the details about the location of the project and showed the location map and Google image of the site. He also showed the details about the plan layout of the building and the details about the parking and the details about the residential flats, the detailed layout plan, parking area plan and the residential floor plans. He mentioned that the total plot area of the existing plot is 1841.98 sq.mtr. which comes under CRZ-II area. The proposed redeveloped into a residential building of Basement+ Ground Floor + 1st to 10th parking floor+10th to 28th Upper Residential floor use.

The total Construction area is 11416.83 sq. mtrs. The total cost of the proposed project is about Rs. 13 crores. The height of the building is 123.75 mtrs. No. of proposed tenements are 46 and total residential and non-residential population is 248. The water requirement is 30 $M^3$/day during the construction phase and in operational phase water requirement is 32 $M^3$/day. The total sewage generation will be 28.0 m3/day out of this 16 m3/day is gray water which will be treated into the Sewage Treatment Plant of capacity 20 CMD consisting of primary, secondary treatment. The treated water will be recycled for flushing and gardening and excess treated water will be connected to MCGM sewerage. The total power requirement is 100 KVA during the construction and same will be provided by BEST undertaking or Tata undertaking. The D.G. set will be in an acoustic enclosure and with sufficient height of stack. The solid waste generated 87.3 kg/day will be segregated into dry and wet waste and wet solid waste 62.1 kg/day will be disposed to MCGM for further treatment and dry waste 25.2 kg/day will be sold to authorized recycler. The rain water harvesting system will be provided. Also at the time of construction activity, necessary precautions will be taken to control the noise pollution.

The Chairman of the Committee Resident Deputy Collector & Addl. Dist. Magistrate, Mumbai City then appealed to the tenants / residents to express their views, doubts, and objections, opinions, suggestions about the project, only from the environmental point of view, if any, so that the project proponent will clarify the same.

The following persons raised the questions.

**Shri. Amar Durgule, Sub Regional Officer, MPC Board, Mumbai-I, convener of the public hearing meeting.**

Question: - How many trees will be planted on site? Where is the location of proposed STP?

Answer: Shri. Saurabh Jayswal the technical consultant of the said project informed that informed that they are going to plant taller trees due to space constrain. The STP will be proposed at the basement.

**Shri. Chandrakant Thorat, Residential Deputy Collector & Addl. Dist. Magistrate, Mumbai City.**

Question: - What is the present status of the project? What is the proposal for treatment of Organic waste generated?

Answer: Shri. Saurabh Jayswal the technical consultant of the said project informed that at present the old depleted structure is demolished and the construction work upto 9th floor is completed and the work is stopped due to the direction received from Environment Department. The solid waste (debries) generated is disposed off as per the BMC approved land.

Finally, the Convener informed the public that all the views expressed in the meeting, letters if any submitted and the project proponent's reply will be put in minutes of the meeting and forwarded to the MCZM Committee, Environment Department, Mantralaya, Mumbai.

The Resident Deputy Collector & Addl. Dist. Magistrate, Mumbai City and Chairman of the Committee thanked all the panel members, tenants / residents and the project proponent for co-operation to conduct the public hearing successfully and concluded the hearing.

( Amar Durgule )
Member/Convener,
Sub-Regional Officer, Mumbai,
M.P.C. Board, Mumbai

( Chandrakant Thorat )
Resident Deputy Collector &
Addl. Dist. Magistrate,
Mumbai City
and
Chairman
Public Hearing Panel

# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

*Tel: 24024022/24020781/ 24010437*
*Fax: 24093814 / 24044532*
*website: http://www.mpcb.gov.in*
*E-mail: enquiry@mpcb.gov.in*

*Kalpataru Point, 3rd Floor,*
*Sion - Matunga Scheme Road No. 8,*
*Near Sion Circle, Sion (E)*
*Mumbai - 400 022*

**No. BO/JD (WPC)/PH/B-** 3164 **Date:** 13 **/ 07 /2015**

**OFFICE ORDER NO. E- 201 OF 2015**

In compliance of Notification S. O. 1533 dt. 14/09/2006 and amended Notification S.O. 3067 (E) dt. 01/12/2009 of Ministry of Environment and Forests, Government of India, the Public Hearing Panel in respect of proposed project of **reconstruction of existing Building Projects property bearing C.S. No. 577, Malabar Hill, Division, Nepeansea(L.J. Marg), Mumbai** proposed by **M/s. Adroit Estate Developers Pvt Ltd, property bearing C.S. No. 577, Malabar Hill, Division, Nepeansea(L.J. Marg), Mumbai**, Maharashtra is as below;

1) **District Magistrate, Mumbai** — **Chairman**
Or his representative not below the
Rank of an **Additional District Magistrate**

2) Representative of Maharashtra Pollution Control Board
Sub Regional Officer, M. P. C. Board, Mumbai –I
will work as; — **Member, Convener**

The Members are requested to make it convenient to attend the Public Hearing dt.**07.08.2015 at 11.30 am. at** Collector Office (Mumbai), Old custom House , **Shahid Bhagatsingh Marg, fort Mumbai 4000001, Maharashtra** positively.

**(Dr. P. Anbalagan IAS)**
**Member Secretary**

**Copy submitted for Information to:**

1) The Additional Chief Secretary, Environment Department, Govt. of Maharashtra, Mantralaya, Mumbai- 400 032
2) The Chairman M. P. C. Board, Mumbai

**Copy for Information to:**
District Collector, Mumbai .

**Copy to project proponent:**
**M/s. Adroit Estate Developers Pvt Ltd, property bearing C.S. No. 577, Malabar Hill, Division, Nepeansea(L.J. Marg), Mumbai**

**Copy for Information & necessary action to:**

1) Regional Officer, M. P. C. Board, Mumbai .
2) Sub Regional Officer, M. P. C. Board, Mumbai-I - He is instructed to ensure that the copies are served to all concerned.
3) EIC, M. P. C. Board, Mumbai - For information & display on website. – Soft copy of Executive Summary sent to EIC section.

**MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD**
**Regional Office, Mumbai / Sub Regional Office, Mumbai-I**
Raikar Chambers, "A wing", 216, 2nd Floor, Deonar Gaon Road,
Near Jain Mandir, Govandi (E), Mumbai-400 088.
**Phone No. :-** (022) 2550 5928 **Fax. No.** (022) 2550 5826
**e-mail :-** sromumbai1@mpcb.gov.in **Website :-** http://mpcb.gov.in

## NOTICE FOR ENVIRONMENTAL PUBLIC HEARING

An Application from **M/S. ADROIT ESTATE DEVELOPERS PVT. LTD.** for the proposed redevelopment at Plot bearing C. S. No. 577, Malbar Hill Division, "D-Ward", Nepean Sea Road, Mumbai-400 007 is received to Maharashtra Pollution Control Board. It is necessary to conduct Public Hearing under Item No. 8 V (d) (c) 4 as per Coastal Regulation Zone (CRZ) Notification Dtd. 6th **Jan. 2011.** The Public hearing is to be conducted from the Environmental angle about the proposed project. Only tenants / Residents of above said building can participate in the Public Hearing.

**Date of Public Hearing : 07.08.2015**
**Timing of Public Hearing : 11:30 a. m.**
**Venue : Office of Collector & District Magistrate Mumbai (City), Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Mumbai-400 001.**

An interested persons are requested to send their comments directly to Member Secretary, State level Environment Impact Assessment Authority at the following address.

**MEMBER SECRETARY,**
**State level Environment Impact Assessment Authority,**
**Environment Department, R. No. 217, Mantralya Annexe,**
**Mumbai-400 032. Tel. No. (022) 2287 3845, 2279 3132.**

Suggestions, views, comments and objections of the tenants / Residents can be filed / registered at the following addressees in writing **within 30 days** from the date of publication of this notice. Also Suggestions, views, comments and objections in oral and written can be presented during the Public Hearing.

**Copies of the Executive Summery of the Project in English / Marathi and Environmental Impact Assessment study are available at the following Offices. Concerned persons may study the above documents during the Office hours.**

1) **Office of the Collector,** Mumbai City, Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Fort, Mumbai-400 001.
2) **Environment Dept.** Govt. of Maharashtra, 15th Floor, New Administrative Bldg., Mantralaya, Mumbai.
3) **Joint Director (WPC),** M. P. C. Board, Sion, Mumbai.
4) **Regional Officer-Mumbai/Sub-Regional Officer,** Mumbai-I, MPC Board, Raikar Chembers, "A" wing, 216, 2nd Flr., Deonar Gaon Rd., Near Jain Mandir, Govandi (E), Mumbai-400 088.
5) **Astt. Commissioner,** 'D' ward, Office Bldg., R. No. 110, 1st Flr., Jobanputra Compound, Nana Chowk, Mumbai-400 007.

Sd /-
**Sub-Regional Officer, Mumbai-I.**
**M. P. C. Board, Mumbai.**

मे. अॅड्रॉइट इस्टेट डेव्हलपर्स प्रा.ली.
सि.स.नं. ४७७, ~~नेपियनसी रोड मलबारहिल~~
'डी' वार्ड मुंबई

| क्र | नांव | पत्ता | सही |
|---|---|---|---|
| १) | श्री. चंद्रकांत थोरात निवासी जिल्हाधिकारी तथा अपर जिल्हादंडाधिकारी, मुंबई शहर | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई | [signature] |
| २) | अमर बा ~~दुर्गुळे~~ आयोजक तथा उ.प्रा.अ. ... मंडळ मुंबई | ... मुंबई-८८ | अमर दुर्गुळे |
| 3) | Kanti Gowani | Adroit Estate Pvt LTD., Kamla House, Tulsi-Pipe Road Mumbai | Gowani |
| 4) | Rajan Gordi | Adroit Estate Pvt Ltd. | [signature] |
| 5) | Shailesh Satam | Adroit Estate Pvt Ltd. | [signature] |
| 6) | Prathamesh S. Shetye | Aqura Lab's Pvt. Ltd. | [signature] |
| 7) | | | |

DELTA CORP LIMITED

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

प्रादेशिक कार्यालय, मुंबई / उप प्रादेशिक कार्यालय, मुंबई-१
रायकर चेंबर्स, 'ए विंग', २१६, २रा मजला, देवनार गांव रोड, जैन मंदिराजवळ,
गोवंडी (पूर्व), मुंबई-४०० ०८८, दूरध्वनी क्र. (०२२) २५५० ५९२८
फॅक्स क्र. (०२२) २५५० ५९२८ ई-मेल :- sromumbai1@mpcb.gov.in
संकेतस्थळ :- http://mpcb.gov.in

## पर्यावरण विषयक जाहीर जन सुनावणी

मे. ॲंड्रॉईट इस्टेट डेव्हलपर्स प्रा. लि. यांचेकडून सी. एस. क्र. ५७७, मलबार हिल विभाग, 'डी' वॉर्ड, मुंबई-४०० ००७ येथील रहिवाशी इमारत पुनर्बांधणीचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झालेला असून सदर प्रस्ताव हा पुनर्प्रस्थापित सागरी तटीय विनियमन क्षेत्र अधिनियम ६ जानेवारी, २०११ मध्ये मुद्दा क्र. ८ व्ही (डी) (सी) ४ नुसार पर्यावरण विषयक जन सुनावणी खालील प्रमाणे ठेवण्यात येत आहे. सदर प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जन सुनावणी ही केवळ इमारतीच्या कायदेशीर रहिवाशी / भाडेकरूंकरिता असेल.

**जाहीर सुनावणीची तारीख** : ०७.०८.२०१५
**जाहीर सुनावणीची वेळ** : स. ११:३० वाजता
**जाहीर सुनावणीचे ठिकाण** : **जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई (शहर), ओल्ड कस्टम हाऊस, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

सर्व संबंधित व्यक्तींना विनंती करण्यात येते की, त्यांचे विचार / आक्षेप / टिप्पणी मा. सदस्य सचिव, पर्यावरण प्रभाव निर्धारण प्राधिकरण (SEIAA) महाराष्ट्र यांना अग्रेषित करून खालील पत्त्यावर पाठविण्यात यावेत.

**मा. सदस्य सचिव,**
**पर्यावरण प्रभाव निर्धारण प्राधिकरण (SEIAA) महाराष्ट्र.**
**पर्यावरण विभाग, रुम नं. २१७, मंत्रालय, अनेक्स, मुंबई-४०० ०३२.**
**दूरध्वनी क्र. (०२२) २२८७ ३८४५, २२७१ ३१३२**

प्रकल्पाबाबत संबंधित भाडेकरू रहिवाशांना त्यांच्या सूचना, टिका-टिप्पणी, विचार तसेच आक्षेप जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर ३० दिवसांचे आत खालील पत्त्यावर पाठविण्यात यावे. तसेच सर्व संबंधित व्यक्तींनी त्यांच्या सूचना, टिका-टिप्पणी, विचार, आक्षेप जाहीर सुनावणीच्या दरम्यानसुद्धा लेखी किंवा तोंडी स्वरूपात नोंदविता येतील.

**सदर प्रकल्पासंबंधी माहिती असलेली कार्यकारी सारांशाची इंग्रजी व मराठी मधील एक एक प्रत खालील कार्यालयामध्ये उपलब्ध होतील. संबंधित व्यक्ती या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत सदर कागदपत्रे अभ्यासू शकतील.**

१) **जिल्हाधिकारी कार्यालय,** मुंबई शहर, ओल्ड कस्टम हाऊस, शहिद भगतसिंह मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
२) **पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन,** १५ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय, मुंबई.
३) **सह संचालक (जल प्रदूषण नियंत्रण),** म. प्र. नि. मंडळ, सायन, मुंबई.
४) **प्रादेशिक अधिकारी**-मुंबई/उप-प्रादेशिक अधिकारी, मुंबई-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायकर चेंबर्स, 'ए' विंग, २१६, २रा मजला, देवनार गांव रोड, जैन मंदिराच्या जवळ, गोवंडी (पूर्व), मुंबई-४०० ०८८.
५) **सहाय्यक आयुक्त,** 'डी' वॉर्ड, ऑफिस बिल्डिंग, रुम नं. ११०, १ला मजला, जोवानपुत्र कम्पाऊंड, नाना चौक, मुंबई-४०० ००७.

स्वाक्षरी/-
**उप-प्रादेशिक अधिकारी, मुंबई-I.**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई.**